# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE
REACHING NATIONS

*India's National Spiritual Newspaper*

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXV | JULY 2023 | No. 06


### पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

यशाया : ४९ : १-६

१) द्वीपांनो, माझे ऐका; दूरदूरच्या राष्ट्रांनो कान द्या; मी गर्भावस्थेत असतानाच परमेश्वराने मला बोलाविलें, मी मातेच्या उदरात होतो तेव्हाच त्याने माझे नांव घेतले.

२) त्याने माझे मुख तीक्ष्ण तरवारीसारखे केले; त्याने मला आपल्या हाताच्या छायेखाली लपविले; त्याने मला चकचकीत बाणासारखे करुन आपल्या भात्यांत गुप्त ठेविले.

३) तो मला म्हणाला, तूं माझा सेवक आहेस; मला शोभा आणणारा तूं इस्राएल आहेस.

४) मी तर म्हणालो होतो की मी व्यर्थश्रम केले, मी आपले बळ उगीच व निरर्थक वेचिले; तथापि माझा न्याय परमेश्वराच्या हाती आहे; माझे प्रतिफळ माझ्या देवाच्या हाती आहे.

५) मी याकोबास त्याजकडे परत आणावे, त्याजजवळ इस्राएल एकत्र जमवावे म्हणून आपला सेवक होण्यासाठी ज्या परमेश्वराने गर्भाशयांत घडिले, ज्या परमेश्वराच्या दृष्टीने मला मान मिळाला व जो माझा देव माझे सामर्थ्य झाला,.

६) तो परमेश्वर म्हणतो. याकोबाच्या रक्षिलेल्या लोकांस परत आणावे म्हणून तू माझा सेवक व्हावे यांत काही मोठसे नाही; तर मजकडून होणारे तारण तूं दिगंतापर्यंत न्यावे म्हणून मी तुला राष्ट्रांचा प्रकाश असा नेमितो.

# निवड ! CHOICES!

(सिस्टर अन्जेलीना सेल्वाकुमारी)



आपले दैनंदीन जीवन अनेक पसंती आणि निवडींनी भरलेले आहे. प्रत्येक निवडीला किंवा पसंदीला तिचा परिणाम असतो. काही सार्थ किंवा अर्थपूर्ण असतो तर काही नसतो. जोडीदार/जोडीदारिण निवड करणे, जीवनमार्ग निवडणे इत्यादी. जीवनाला कलाटणी देणारा ठरु शकतो. काही कोणते कपडे परिधान करावे, काय खावे यासारखे ऐहीक आणि कंटाळवाणे असतात. देवाने मनुष्य प्राण्याला उत्पन्न करताना त्याला इच्छा शक्ति देऊन उत्पन्न केले. मनुष्यांना बरे आणि वाईट निवड करण्याची शक्ति असते. तरी देखील देव नेहमीच आपल्याला मार्गदर्शन देतो, त्याच्या आपल्याविषयी असलेल्या अपेक्षा दर्शविती, परंतु त्याच्या इच्छेनुसार निवड करण्यासाठी जबरदस्ती मात्र करीत नाही. आपल्या करीत त्याने जे योजून ठेविले आहे, ते स्वेच्छेने आपण निवडावे असे इच्छितो.

या सृष्टीचा निर्माण कर्ता आपला देव आपल्यावर इतके अधीक प्रेम करीतो कि, आपण त्याला ओळखावे आणि त्याजवर प्रेम करावे याची देखील निवड करण्याची मोकळीक देतो. आपला सार्वभौम देव आपण कोणत्याही परिस्थितीत त्याची निवड करावी अशा प्रकारे जबरदस्ती करीत नाही. तो मनुष्य जातीबरोब संबंध ठेवू इच्छितो; परंतु ते आपणावर लादत नाही; त्या उलट त्याला अधीक ओळखावे याविषयी आपण निवड करण्याची तो वाट पाहत असतो.

(...पान ३ वर) 3




एको ऑफ हिज कॉल पाच मिनिटांचा संदेश

यू ट्युब ख्रिश्चन चॅनल

पास्टर सॅम सेल्वा राज

यांच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

प्रतिदिनी - पहाटे पाच वाजता रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)



# तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



**आमचे कार्याविषयीचे धोरण**

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

CHIEF EDITOR

Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

ADMINISTRATION

Bro. N. Prakasam, M.A., General Manager
Dr. Rabinder Boaz, M.S.
Bro. K. Puratchivendan

EDITORIAL BOARD

Sis. Jesy Veena Sam
Sis. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Dr. A. Richard Samuel, M.A., Ph.D.
Rev. Dr. K.R. Rajasekaran

EDITOR, PUBLISHER & PRINTER

Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 95661 31858

E.mail ID

sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

WEBSITES

www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

YOUTUBE CHANNEL

Echo of His Call

## “...त्याने... स्वमुखाने हे वचन दिले होते व त्याने स्वहस्ते हे पूर्ण केले...” (१ राजाओ १८:१५)

ख्रिस्तामधील अति प्रियानों!

आम्ही आपल्या प्रभु आणि तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या नामात तुम्हाला शुभेच्छा देत आहोत.

मागील महिन्याच्या **एको ऑफ हिज कॉल** मासिकातील लेख वाचल्यानंतर त्यावर लोकांनी स्तुती केली. आम्ही त्या सर्वांचे आभार मानीत आहोत. आम्हावर जे अंत:करणपूर्वक प्रेम करीत आहेत आणि **एको ऑफ हिज कॉल** मासिक आणि इतर सेवाकार्याकरिता त्यांच्या प्रार्थना आणि उत्तम सुचनां द्वारे आधार देत आहेत अशा सर्व देवाच्या लोकांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करीत आहोत.

आम्ही तुम्हाला तुमचा E-mail ID पाठविण्यास सांगितला होता. ज्यांनी तो पाठविला आहे, त्या सर्वांना E-mail ID वर देखील मासिक पाठविणार आहोत आमचे १६ भाषांमधील मासिक छापून तयार झाल्या बरोबर आम्ही ते आमच्या www.echoofthiscall.org या वेब साईटवर अपलोड करीत असतो. तुम्ही मासिक त्यामधुन देखील वाचू शकता; त्याच्या प्रती काढू शकता. त्याबद्दल चिंता करु नका. तुमच्याकडे या सर्व मार्गाद्वारे मासिक पोहचेल.

आपण सर्वजण दररोज रात्री १० वाजता आंतरराष्ट्रीय तरुणतरुणी आणि लेकरांकरिता ज्या प्रार्थना करीत आहोत त्याला वाचकांकडून उत्तम प्रतिसाद प्राप्त होत आहे आणि देवाकडून देखील उत्तम प्रकारे उत्तर मिळत आहे. प्रभुची स्तुति असो.

आम्ही अतिशय जलद गतिने आणि चलाखीने कृति करीतो. मे महिन्यात लेकरांकरीता सुट्टीतील शास्त्राभ्यास शाळा (VBS) भरविण्यात आल्या होत्या. ३ जून रोजी **नहेम्या बायबल कॉलेज**चा दिक्षांत विधी विशेष पद्धतीने करण्यात आला. ५ जून २०२३ रोजी **नहेम्या बायबल कॉलेज** आणि **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल**च्या २०२३-२४च्या शैक्षणीक वर्षाचे वर्ग सुरू झाले. सर्व वर्ग सुरळीतपणे आणि प्रभावितपणे चालावेत यासाठी कृपया प्रार्थना करीत राहा. आमच्यासाठी देखील प्रार्थना करा.

आमच्या यूट्युब चॅनलवरुन दररोज पहाटे ५ वाजता इंग्रजी, हिन्दी, तामिळ आणि तेलगू भाषेत मननपर संदेश प्रसारीत होत आहे. कृपया आमचा ९८४१०७१८५८ हा मोबाईल क्रमांक तुमच्या मोबाईलमध्ये नोंद करा. त्या द्वारे तुम्ही सेवाकार्याची माहिती प्राप्त करु शकाल. त्याचप्रमाणे आमच्या **एको ऑफ हिज कॉल यूट्युब चॅनल**चे वर्गणीदार बना.

‘समय’ तंज्ञज्ञानाच्या माध्यमातून जलद गतीने धावत असताना आम्हाला देखील ते आवडो किंवा न आवडो-धावावे लागत आहे. कोणत्याही पद्धतीने कां होईना शुभवर्तमान संदेश सर्व लोकांपर्यंत पोहोचो. देवाचे गौरव असो. आमेन.

आपला प्रेमळ प्रभु येशू ख्रिस्त तुम्हा सर्वांना आशीर्वाद देवो.

**ख्रिस्त येशूमधील तुमचे दास,**

पास्टर एस. सॅम सेलवा राज आणि ॲलेक्स सॅमसन सॅम
(+91) 98412 71858 / 98410 71858, E.mail : samselvaraj333@gmail.com

Our Ministries: ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) BIBLECOR - Postal Courses (3 languages) Media Ministry Online Courses Theological Correspondence Courses (2 languages) Church Planting Nehemiah Bible Colleges Gospel Printing Press Great Commission Partners St. Paul's Matriculation School Crusades Community Development

(पान १ वरुन...)

बायबल याकोब ४:८ या वचनात म्हणते, **"देवाजवळ या म्हणजे तो तुम्हांजवळ येईल."** बायबल असे देखील म्हणते, आपण त्याला निवडले नाही, येशू ख्रिस्ताने आपल्याला निवडले. **"तुम्ही मला निवडले नाही, तर मी तुम्हाला निवडले..."** (योहान १५:१६) आणि त्यानेच प्रथम आपल्यावर प्रेम केले. **"पहिल्याने त्याने आपणांवर प्रीति केली..."** (१ योहान ४:१९). आपण त्याला निवडावे किंवा त्याजवर प्रेम करावे अशी जबरदस्ती केलेली कोठेही पाहावयास मिळत नाही तो आपणांस स्वेच्छाशक्ति देणारा असा सभ्य देव राहीला आहे. आपणा सर्वांना संधी देण्यात आलेली आहे; केवळ थोडकेच याचा लाभ घेऊन उपयोग करुन घेतात.

बायबल मधील काही प्रमुख व्यक्तिनी केलेल्या निवडी वर मनन करु या.

## दोन चोर

येशू ख्रिस्ताच्या उजव्या आणि डाव्या बाजूच्या वध:स्तंभावर टांगण्यात आलेल्या दोन चोरांचे उदाहरण घेतले तर त्यापैकी एकाने म्हटले, **"अहो येशू; आपण आपल्या राजाधिकारानें याल तेव्हा माझी आठवण करा."** (लूक २३:४२). येशून त्याला उत्तर दिले, **"...तूं आज माझ्याबरोबर सुखलोकात असशील."** (लूक २३:४३). तर दुसऱ्याने त्याच्या जीवनाच्या शेवटच्या मिनिटावर असताना देखील येशू ख्रिस्ताचा उपहास करण्याचे ठरविले. एका चोराने पच्छाताप केला आणि देवाला त्याची आठवण करण्याची मागणी केली, तर दुसऱ्याने संधी गमावली आणि येशू ख्रिस्तावर आरोप करीत त्याच्यात दोष शोधू लागला. त्या दोघांची हि निवड होती. त्या दोघांपैकी कोणाला देखील बळजबरी करण्यात आली नाही, परंतु ते जीवन बदलणारा निवडीचा क्षण ठरला, तो केवळ ज्या चोरांची त्याची आठवण करावी अशी इच्छा होती त्याचाच नाही तर आपल्या सर्वांकरीता देखील त्यामुळेच २०२३मध्ये त्याबद्दल आपण बोलत आहोत.



## शताधिपती!

येशू ख्रिस्ताला वध:स्तंभावर खिळीले त्या दिवशी अनेक शताधिपती कर्तव्यकर्मावर (duty) होते; जे देवाच्या कोकऱ्याच्या भयानक मृत्युचे साक्षीदार होते. येशू एक वेगळा आहे, हे त्यांना दिसत होते परंतु एका मनुष्याशिवाय ते कबूल करण्याची कोणाचीही तयारी नव्हती. ख्रिस्ताच्या वध:स्तंभाच्या पायथ्याशी एक शताधिपती होता, तो म्हणाला **"... खरोखर हा देवाचा पुत्र होता."** (मत्तय २७:५४). ख्रिस्त कोण होता हे त्याने उघडपणे कबूल केले असे विधान करण्यास किंवा वक्तव्य करण्यास धैर्य लागते. आज देखील आपल्या बहिणी आणि बंधु आहेत ज्यांना त्यांच्या विश्वासामुळे छळण्यात येत आहे, तुरुंगात टाकण्यात येत आहे, नग्न करुन त्यांच्या स्वत:च्या लोकांद्वारे लाज काढली जाते; जाळण्यात येते, वृद्ध माता-पित्यांचा छळ केला जातो. परंतु हे सर्व सहन करुन ते विश्वासात खंबीर आहेत. **"ख्रिस्ताच्या प्रीतीपासून आपल्याला कोण विभक्त करील? क्लेश, आपत्ति, छळवणूक, उपासमार, नग्नता, संकट किंवा तरवार ही विभक्त करतील काय?"** (रोम ८:३५). पौलाला असे म्हणण्यास बळजबरी केली नव्हती तर ती त्याची स्वत:ची निवड होती.

## पिलात!

पिलात ही एक दुसरी व्यक्ति होती, जीच्याकडे येशू ख्रिस्तसाठी जीवन बदलून टाकणारा निर्णय देण्याचा अधिकार होता, परंतु लोकांना मदत व्हावी, स्वत:ला प्रतिष्ठा मिळावी आणि यहूद्यांची मर्जी संपादन करावी. या उद्देशामुळे त्याने जे करावयास हवे होते ते करण्यात तो अपयशी ठरला. बायबल असे म्हणते, **"एखाद्याचे बरे करणे उचित असून ते करण्याचे तुझ्या अंगी सामर्थ्य असल्यास ते करण्यास माघार घेऊ नको"** (नीतिसूत्रे ३:२७). आणि **"तर मग आपणाला प्रसंग आहे त्याप्रमाणें आपण सर्वांचे व विशेषत: विश्वासबंधूंचे बरे करावे."** (गलती ६:१०). पुन: एकदा आपल्याला निवड करण्याची संधी दिलेली आहे आणि बायबल आपणांस सुचना देते की आपण चांगले करण्या संबंधीत जाणीवपूर्वक निर्णय घ्यावा. मुद्यामुन निवड करावी.

देवाने तुम्हाला अशा स्थानी किंवा जागी ठेविले असेल, जेथे तुम्ही दु:खी (भग्न) गरजवंत, असहाय, अधिकारशून्य, गृहहिन, शारिरीक आणि मानसिक दृष्ट्या दुर्बळ अशांना मदत करु शकता तर त्यांना मदत करण्याची निवड करा. योग्य कारणाकरीता लढा देण्याकरीता विजेत्यांची गरज असते. मदर टेरेसा अशी एक विस्मयकारक स्त्री होती, जीने तीचे संपूर्ण आयुष्य दुर्बल आणि आजाऱ्यांना मदत करण्यात खर्च केले. ॲमि कारमायकल या उत्कृष्ट खेळाडूने तरुण मुलींच्या अधिकाराकरीता लढा दिला. समाजातील दुबळ्या घटकांना मदत करण्याकरीता त्यांना जे करीता आले ते त्यांनी केले. त्याउलट आपल्या बंधु-भगीनींकरीता वेळ देऊ शकत नाही असे स्वार्थी जीवन जगणारे लोक पाहून दु:ख वाटते. त्याहिपेक्षा अधिक दु:ख होते, जेव्हा ती स्थिती आपल्या मंडळ्यांमध्ये पहावयास मिळते. देव को आणि आपणांस हि स्थिती बदलण्यास कृपा पुरवो आणि आपण तो बदल होऊ द्या.

पिलात जाणून होता की येशू निर्दोष आहे आणि येशूला सोडून देण्याची निवड करण्याची संधी त्याला होती. मला वाटते की त्याची येशूला सोडून देण्याची मनापासून इच्छा होती. परंतु तो ते सार्वजनीक पणे करु इच्छित नव्हता. पिलाताने लोक येशूला सोडून द्या अशी मागणी करतील असे गृहीत धरून त्याने अतिशय व्यवहारचातुर्याने लोकांसमोर येशू किंवा बरब्बा या दोघांपैकी



एकाला सोडून देण्याची निवड करण्याचा पर्याय ठेवला. परंतु खेदाची बाब, त्यांनी बरब्बाला सोडून देणे निवडीले. येथे पुन: पाहतो की पिलाताने संधी गमावली परंतु यहूदीयांनी संधीचा अयोग्य कारणाकरिता उपयोग करुन घेतला. संधी गमावली!!

आपणापैकी किती जणांनी निवड करण्याची वेळ असताना संधी साधण्यात अपयशी ठरलो. परंत आपल्याला कृपाळुपण दुसरी संधी उपलब्ध करुन देणारा आपला देव आहे. आपण जरी संधी गमावली, देव नेहमीच दुसरी दैवी योजना घेऊन आपल्याकडे येतो. अशी हि देवाची प्रीती आहे. आज कदाचीत येथे बसलेले असताना, विचार करीत असाल, मी हे करु शकलो असतो, ते करु शकलो असतो, परंतु आता माझे वय झाले आहे, मी अशक्त झालो आहे, वर्षे वाया घालविली!

प्रिय बंधु आणि बहिणींनो,तुम्ही असा विचार करीत असाल, मी माझा वेळ व्यर्थ घालविला आणि आता ते सर्व करण्याची वेळ निघून गेली आहे, नाही! देव राज्यात खुप उशीर झाला असे कदापी होत नाही. मोशेंचा ४० वर्षाचा असताना नाही तर ८० वर्षाचा असताना उपयोग करुन घ्यावा असे देवाला वाटले. तुमची वाया गेलेली वर्षे येशू ख्रिस्ताच्या हातात द्या आणि पाहा तो काहीतरी सुंदर घडविल. मला एक जुने गीत आठवते.

''तुमची छिन्न-विछिन्न झालेली स्वप्ने, खेळण्याप्रमाणे तुटलेली अंत:करणे; सर्व येशूला द्या. कारण तोच तुमच्या दु:खांचे आनंदात रुपांतर करील.'' आपण सर्वजण ते सर्व येशूला देण्यास शिकू या.

# पेत्र

पेत्र हा येशू ख्रिस्ताच्या पहिल्या शिष्यांपैकी एक होता. येशू ख्रिस्ताच्या अंतत्तवर्तुळात असलेल्या तीन शिष्यांतील तो एक होता. तो येशू ख्रिस्ताच्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांत होता, तो डोंगरावरील येशू ख्रिस्ताच्या रुपांतराचा देखील साक्षीदार होता.

मला पेत्राच्या स्वभावगुण प्रिय वाटतो. संवेदनशील आणि आवेशी अशी व्यक्ति. रुपांतराच्या डोंगरावर तो येशू ख्रिस्त, मोशे आणि एलिया या तिघांकरीता मंडप बांधू इच्छित होता. येशू ख्रिस्त त्याच्या भयानक मृत्यु विषयी बोलला, तेव्हा पेत्र अतिशय भावना विवश होऊन बोलला, ''**प्रभुजी, मी आपणा बरोबर बंदिशाळेत व मरावयालाही जाण्यास तयार आहे.**'' (लूक २२:३३). तो संरक्षण करण्याची इच्छा असणारा आणि रागीट स्वभावाचा देखील होता. शिपाई येशूला अटक करण्यास आले त्यावेळेस तो चिडला आणि त्याने शिपायाचा कान कापला अशा प्रकारे पेत्र प्रत्येक बाबतीत भावना विवश होता असे म्हणू शकतो. कोणती का परिस्थिति असो त्याला पुढे रहावेसे वाटे आणि नेहमीच पुढाकार घेत असे.

पेत्र लोकांत मिसळणारा व्यक्ति होता. त्याचे त्याचा भाऊ आंद्रिया याच्याबरोबर घनिष्ट नाते होते, त्यामुळेच आंद्रियाने त्याला येशूला भेटण्यास बोलाविल्या बरोबर त्याजबरोबर तो गेला माझी खात्री आहे, त्यांचा वांशिक प्रतिस्पर्धेमध्ये देखील भाग असावा. आपण पेत्राच्या सासू बद्दल देखील वाचतो, यावरुन दिसून येते की तो कुटुंबाच्या अगदी जवळ होता. तो उद्दीष्ट पूर्ण करणारा होता. येशू कोण आहे हे त्याला ठाऊक होते हे येशू ख्रिस्त हा येणारा मसीहा आहे हे दर्शविण्याद्वारे त्याने सिद्ध केले. हे त्याचे स्वभाव गुण त्याच्या सेवेमध्ये देखील पहावयास मिळतात.

या अशा समर्पित, प्रेमळ, भावना प्रधान, लोकांची आवड असणारा, ज्याने येशूला मानाचे स्थान दिले होते तो अचानक येशूला कसा काय नकार देवू शकतो? ते देखील येशूने अगोदरच चेतावणी दिलेली असताना एकदा नाही तर तिनदा नाकारले. त्याने केवळ नाकारीलेच नाही तर शापोच्चार

(...पान ६ वर)

नहेम्याह बाइबल कॉलेज
रेसिडेन्शल कॉलेज, चेन्नई।
माध्यम: हिन्दी
सदस्यता के लिए पंजीकृत उम्मीदवार - ATA
सुविख्यात अंतर्राष्ट्रीय मसीही अगुवे तथा पिछले 53 वर्षो से सेवारत वरिष्ठ पासवान
Diploma in Ministry : One year
Diploma in Theology : Two years
Bachelor of Theology : Three years
योग्यता 10 वी या अधिक
जल्दी करें!
Contact : The Chairman, Nehemiah Bible College.
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org
★ ऑनलाइन कक्षाएं उपलब्ध हैं ★

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

स्तुति आणि प्रार्थनेचे मुद्दे १९ जुलै ते १८ ऑगस्ट२०२३ पर्यंत

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## ✝ स्तुति करिता मुद्दे

**१९ जुलै** : आमच्या **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल, नहेम्या बायबल कॉलेज** आणि **पत्र व्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रमा** बद्दल.

**२० जुलै** : आमच्या सर्व सहसंपादकांना आणि त्यांच्या कुटुंबियांना आशीर्वाद दिल्याबद्दल.

**२१ जुलै** : आमच्या **नहेम्या कॉलेज**साठी निवासी आणि **सायंकालीन अभ्यासक्रम**करिता नवीन विद्यार्थी दिल्याबद्दल.

**२२ जुलै** : मिशन कार्यातील सेवक वर्गाच्या जबाबदारी बद्दल.

**२३ जुलै** : आमच्या सर्व प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीवन भागीदार आणि महान आज्ञापालनातील भागीदार व त्यांच्या कुटुंबियांवर दर्शवित असलेल्या दये बद्दल.

**२४ जुलै** : आमच्या मुख्य मंडळीतील आणि सर्व शाखा मंडळ्यातील पाळक आणि वरीष्ठ सभासदांना आशीर्वादीत केल्याबद्दल.

**२५ जुलै** : आमच्या कुशल कारागीरांद्वारे शुभवर्तमान मुद्रणालय सतत निर्विघ्नपणे सुरु असल्या बद्दल.

**२६ जुलै** : १९६९ सालापासून मासिक प्रसिद्ध करण्याच्या सेवेवर विपुल आशीर्वाद दिल्याबद्दल.

**२७ जुलै** : मुख्य मंडळीत अधिक नवीन विश्वासणाऱ्यांची भर घातल्याबद्दल.

**२८ जुलै** : आमच्या बालाजी नगर, संतोषपुरम आणि बेलाचरी मंडळ्याच्या रविवारच्या उपासनेत नवीन विश्वासणाऱ्यांची भर घातल्या बद्दल.

**२९ जुलै** : २०२३-२०२४ या **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल** व **नहेम्या बायबल कॉलेज**च्या शैक्षणीक वर्षाकरिता नवीन विद्यार्थी दिल्याबद्दल.

**३० जुलै** : जागतिक तरुण/तरुणी आणि लेकरे यांच्या बद्दलच्या दर्शनाबद्दल.

**३१ जुलै** : देवाचे वचन पोहचले नाही, अशापर्यंत ते ५ मिनिटांच्या 'यूट्युब' सेवाकार्याद्वारे पोहचविणे आशीर्वादीत करीत असल्याबद्दल

**०१ ऑगस्ट** : दुर्गम भागात सुवार्ता गाजविण्यास आशीर्वाद देत असल्याबद्दल.

**०२ ऑगस्ट** : सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूलसाठी आवश्यक असलेले अधीक ख्रिस्ती शिक्षक आणि प्रिन्सिपल देऊन आशीर्वादीत केल्याबद्दल.

**०३ ऑगस्ट** : आमच्या मंडळ्यांच्या पाळक वर्गाकरिता आणि अधिकारी वर्गाकरिता.

## ✝ प्रार्थने करीत ा मुद्द

**०४ ऑगस्ट** : देवाच्या कृपेचा वर्षाव परत एकदा लोकांवर व्हावा.

**०५ ऑगस्ट** : सुट्टीतील शास्त्राभ्यास शाळेत ज्या असंख्य लेकरांना येशू ख्रिस्ताच्या प्रितीचा स्पर्श झाला त्यांनी त्याजमध्ये रहावे आणि आमच्या मंडळीच्या उपासनेत नियमितपणे यावे.

**०६ ऑगस्ट** : मिशनऱ्यांवर आणि देवाच्या सेवकांवरील हिंसामय कृत्ये थांबली जावीत.

**०७ ऑगस्ट** : संपूर्ण जगभरातून 'करोना'चे निर्मूलन व्हावे.

**०८ ऑगस्ट** : कुटुंबात कलह करुन ती विभक्त करण्याचे सैतानी कार्य नष्ट व्हावे.

**०९ ऑगस्ट** : देवाच्या लेकरांना आत्मिक आणि भौतिक आशीर्वाद प्राप्त व्हावेत.

**१० ऑगस्ट** : २०२३-२०२४ या शैक्षणीक वर्षाकरिता **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल**मध्ये प्रवेशाकरिता नवीन विद्यार्थी मिळावेत.

**११ ऑगस्ट** : जगात सर्वत्र आढळणारी आर्थिक मंदी संपुष्टात यावी.

**१२ ऑगस्ट** : आमच्या सेवाकार्यासंबंधीत आर्थिक गरजा पुरविल्या जातात.

**१३ ऑगस्ट** : जगभरातील लोकांच्या सर्व गरजांकरिता.

**१४ ऑगस्ट** : बंगाली मासिकाचे डी.टी.पी. चालक बंधु इंद्रजीत रॉय यांना त्वरीत प्रकृती स्वास्थ्य लाभावे.

**१५ ऑगस्ट** : आमच्या सर्व कर्मचारी वर्गाच्या आणि त्यांच्या कुटुंबाच्या उत्तम प्रकृति स्वास्थ्याकरिता.

**१६ ऑगस्ट** : दररोज पहाटे ५ वाजता यूट्युब द्वारा प्रसारीत होत असलेल्या संदेशाकरिता.

**१७ ऑगस्ट** : आमचे वरिष्ठ पाळक, पास्टर एस सॅम सेल्वा राज आणि त्याच्या कुटुंबाचे दुष्ट शक्तिपासून रक्षण व्हावे.

**१८ ऑगस्ट** : **नहेम्या बायबल कॉलेज** ग्रंथालयातील पुस्तकांचे KOHA Software मध्ये अद्ययावत करण्याकरिता.

(पान ४ वरुन)

देखील केला. हे वाचल्या नंतर कदाचीत त्याच्या विषयी आपले मत बनवून तो इतका भयंकर मनुष्य बनल्याबद्दल त्याचा धिक्कार करु. परंतु आता आपण स्वत: एक समर्पित, जबाबदार असे ख्रिस्ताचे अनुयायी असताना देखील आपल्या कृति शब्द आणि विचार यांच्या द्वारे त्याला नाकारीले याचा विचार करु या. मी लोकांना असे बोलताना ऐकले, ''मी घसरलो ते एका क्षणात घडले.'' किती जणांना असे वाटते की, पेत्राने ते क्षणात केलेले कृत्य होते? टिकाकार या नात्याने या देवाच्या महान अशा प्रेषिताबद्दल चूक करु नये, उलट त्याच्या जीवनाद्वारे आपण धडा शिकावा.

तुम्हाला असे वाटते कां, की ते केवळ त्याच वेळी घडले किंवा ती एक प्रक्रिया होती?

मला वाटते, जो मनुष्य इतका जबाबदार, प्रेमळ, भावनाप्रधान आणि उद्दीष्टाने प्रेरीत त्याने येशूला नाकारावे, ते इतके सहज सोपे नाही. याची सुरुवात केव्हा झाली असे तुम्हाला वाटते? त्याची सुरुवात मत्तय २६:५८ या वचनानुसार ''**दुरुन येशूच्या मागे चालत गेला.**'' तेथुन झाली.

बायबल अतीशय सुंदर रितीने म्हणत आहे, पेत्र दुरुन येशूच्या मागे चालत गेला. आपल्यापैकी अनेक जण येशूवर प्रेम करितात, त्याचे आशीर्वाद उपभोगतात. आपण त्याला आपला पुरवठा करणारा आणि रक्षण करणारा म्हणून ओळखतो परंतु त्याच्या अगदी जवळून त्याला अनुसरण्यास किंवा मागे जाण्यास घुटमळतो आणि दुरुन त्याच्या मागे जाण्यास समाधान मानतो. त्याच्या मागे दुरुन चालत जाणे, आपल्यापैकी काहीजणांना सुरक्षित वाटते, कारण तो आपल्याकडून अधीक काही मागणार नाही. लोक आपल्याला त्याचे अनुयायी म्हणून ओळखणार नाहीत आणि त्यामुळे जगातील आणि देवाकडील उत्तम त्याचा स्वाद घेता येईल. ही अतिशय मनोवेधक हातमिळवणी-किंवा समझोता आहे. प्रियांनो बायबल आम्हाला शिकविते आपण एकाचवेळी जगाचे आणि देवाचे मित्र बनू शकत नाही. याकोब ४.४ ''**अहो व्यभिचारणींनो, जगाची मैत्री ही देवाबरोबर वैर आहे, हे तुम्हास ठाऊक नाही काय?**'' यामध्ये एकतर जगाची बाजू किंवा देवाची बाजू आपण जर देवाच्या बाजूला नाही तर कर्तव्य करण्यास चुकल्यामुळे आपण देवाचे वैरी झालो आहोत. त्यामुळे कोणी कितीही आत्मिक आणि धर्मनिष्ठ असेल परंतु जर त्याने येशू ख्रिस्ताच्या मागे दुरुन चालण्याचे ठरविले तर ती त्याच्यासाठी धोक्याची जागा असेल.

आज तुम्ही येशू बरोबर कसे चालत आहात? तुम्ही जवळून चालत आहात की दुरुन चालत आहात? आपणा सर्वांना ती निवड करावयाची आहे. अगोदर म्हटल्याप्रमाणे येशू ख्रिस्त आपल्यावर इतके प्रेम करीतो की त्यामुळे तो आपल्यावर कोणत्याही प्रकारे बळजबरी करीत नाही. तर त्याने आपल्याला निवडीचे स्वातंत्र्य/स्वेच्छा दिली आहे. असे जरी असले, तरी देखील तो त्याची इच्छा व्यक्त करतो, ''**तुम्ही मजमध्ये राहिला व माझी वचने तुम्हांमध्ये राहिली तर जे काही तुम्हांस पाहिजे असेल ते मागा म्हणजे ते तुम्हास प्राप्त होईल.**' (योहान १५:७). हे वचन आपण देवाबरोबर जवळून चालण्यास शिकविते.

प्रिय मित्रांनो, ज्या जगात आपण राहत आहोत ते इतके काही गुंतागुंतीचे आणि हक्काने मागणी करणारे आहे. आपल्या कामात, कुटुंबात आणि वैयक्तिक जीवनात चलाखी हे एक आवाहन आहे. काही समयी जीवनात निराशेच्या घटना, इजा, विश्वासघात, ताटातूट, मृत्यु, विश्वासघाताने केलेला हल्ला या सर्वांमुळे मानसिक थकवा उत्पन्न करु होऊ शकतो. मला ठाऊक नाही आपल्यापैकी किती जण अशा परिस्थितीत आहेत; तुम्ही कदाचीत म्हणत असाल मी जगत असलेले जीवन हे कोणीतरी दुसऱ्याने घेतलेल्या निर्णयाचा परिणाम आहे, मी यासाठी पात्र नाही.'' आणि तुम्ही यहुदाप्रमाणे येशू ख्रिस्ताच्या मागे चालण्याचे ठरविले.

तुम्ही पेत्राप्रमाणे दुरुन येशू ख्रिस्ताच्या मागे चालणारे आहात कां? तुम्हाला

(...पान ९ वर)

''परमेश्वराने आमच्यासाठी महत्यकृत्ये केली आहेत, त्यामुळे आम्हाला आनंद झाला आहे'' - (स्तोत्र १२६:३)

# एको ऑफ हिज कॉल

## सेवाकार्याचा

## ५५वा वर्धापन दिन

(1969 - 2023)

Place:

**ECHO OF HIS CALL**

**10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET,**
**CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.**
भारत.

**विशेष कार्यक्रम :-**
शुक्रवार, ११-०८-२०२३
शनिवार, १२-०८-२०२३
रविवार, १३-०८-२०२३

*विशेष संदेश वाहक*

# सिस्टर ॲन्जेलीना सेल्वाकुमारी

- कृपया प्रार्थना करा -

संपर्क : पास्टर एस्. सॅम सेल्वा राज, (+91) 98410 71852

## कृपया आमच्या मुख्यालयातील सेवाकार्याकरिता प्रार्थना करा

| | | |
|---|---|---|
| १. | प्रार्थना सेवा | : २४ तास |
| २. | बायबलकोर | : पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम : इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी |
| ३. | एको ऑफ हिज कॉल | : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन |
| ४. | नहेम्या बायबल कॉलेज (दोन केंद्र) (सायंकालीन / निवासी) | |
| ५. | पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ | |
| ६. | महान आजापालनाचे भागीदार (पाळकांचे नेटवर्क) | |
| ७. | प्रशिक्षण कार्यक्रम | |
| ८. | महासभा | |
| ९. | छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा | |
| १०. | शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : | प्रकाशने |
| ११. | सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल | : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल |
| १२. | शब्बाथ शाळा | : सकाळी ८.३० आणि सायंकाळी ४ वाजता - रविवारी |
| **१३.** | **तामिळ उपासना** | **: सकाळी ८.०० आणि १०,०० वाजता - रविवारी** |
| **१४.** | **हिन्दी उपासना** | **: सायंकाळी ४ वाजता - रविवारी** |
| **१५.** | **तेलगु उपासना** | **: सायंकाळी ५ वाजता - रविवारी** |
| **१६.** | **इंग्रजी आणि तामिळ उपासना** | **: सायंकाळी ६ वाजता - रविवारी** |
| १७. | पाळकांचे समुपदेशन | : सायंकाळी ४ वाजता - रविवारी |
| १८. | स्त्रियांची प्रार्थना | : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी |
| १९. | साप्ताहिक शास्त्राभ्यास | : सायंकाळी ६.३० वाजता - बुधवारी |
| २०. | पुरुषांची प्रार्थना | : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी |
| २१. | शिष्यत्वाची सभा | : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी |
| २२. | गृह प्रार्थना सभा | : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी |
| २३. | विशेष प्रभु भोजन | : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी |
| २४. | सेवाकाची समालोचन सभा | : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार |
| २५. | पालकांची प्रार्थना | : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार |
| २६. | रात्रभर प्रार्थना | : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शुक्रवार |
| २७. | उपास प्रार्थना | : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शनिवार |
| २८. | पवित्र सहभागिता | : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत |
| २९. | सकाळचे मनन | : पहाटे ५ वाजता - दररोज |
| ३०. | कार्यालयीन स्टाफचे मनन | : सकाळी ९ वाजता - दररोज |
| ३१. | कार्यालय | : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून) |

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्याह बाईबल कॉलेज**

Echo of His Call, Post Box 2957
CHEPAUK, CHENNAI - 600 005.
Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell : 98410 71852, 95661 31858
E.mail : biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

**मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी**

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर "**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**" च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| Account Name | : | ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST |
| Account Number | : | 1023 2923 805 |
| Bank Name | : | STATE BANK OF INDIA |
| Branch | : | TRIPLICANE, CHENNAI - 600 005 |
| IFSC Code | : | SBIN 0000249 |
| SWIFT Code | : | SBI NIN BB 455 |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**
**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

# माझ्या जीवनात त्याचे मार्गदर्शन आणि दूरदर्शीपणा!

HIS GUIDANCE AND PROVIDENCE IN MY LIFE! ''तो आपले भय धरणाऱ्यांची इच्छा पुरवितो.'' (स्तोत्र : १४५ : १९)

प्रभू येशू ख्रिस्त मजवर इतका कृपाळू होता, की त्याने मला १९८२ साली चेपॉक, चेन्नाई या ठिकाणी मंडळी सेवा सुरु करणे शक्य होऊ दिले. अगदी सुरुवाती पासूनच मंडळीला एका ठिकाणातून दुसऱ्या ठिकाणी आर्थिक कमतरता असल्यामुळे जागा बदलण्याच्या, त्याच बरोबर विभागातील ख्रिस्तीजनांच्या विरोधातील मित्रांच्या विरोधातल्या समस्यां अनुभवास येत होत्या.

सरते शेवटी, आम्ही अशा एका खेळती हवा नसलेल्या छोट्या घरात रविवारची उपासना घेत होतो. हे घर प्रिय बंधु जॉर्ज नावाच्या व्यक्तिच्या मालकीचे होते.

एका विशिष्ट रविवारी उपासना सुरु असताना प्रभूने अनेपेक्षितपणे, अचानक माझ्या आत्म्यात मला उपासनेकरीता याच विभागात आमच्या स्वत:च्या मालकीची प्रशस्त अशी इमारत मिळवून देण्यास त्याजवर विश्वास ठेविल्यास चेतना दिली. देवाने मला मंडळीच्या सदस्यांना देखील; त्यांनी यासंबंधी प्रार्थना करावी यासाठी त्यांना जाहिर करण्यास चेतवीले. मी देवाची आज्ञा पाळली आणि उपासनेत त्याविषयी सांगितले.

- उपासनेत उपस्थित असलेल्या लोक ते ऐकताच उपहासीक नजरेने मजकडे पाहू लागले.

- आपल्या कमकुवत अशा आर्थिक परिस्थितीत अशी मालमत्ता खरेदी करणे खरोखरीच शक्य होऊ शकते कां? असा प्रश्न त्यांनी मला विचारला.

- काही जण मजवर आत्मिक दबाव आणण्याचा प्रयत्न करुन मला विचारु लागले, ''जरी आपल्या जवळ पैसे आहेत, तरी अशा या भरगच्च वस्ती असणाऱ्या विभागात अशी जागा कोठे उपलब्ध असणार?

काही मित्रगण चिंता आणि शंका व्यक्त करीत प्रश्न केला, ''देवाच्या सभ्य अशा व्यक्तिने देवाच्याच नावाने असा अव्यवहार्य निरोप देणे योग्य आहे कां?''

अशा या सर्व कारणांमुळे मी अनेक प्रकारे गोंधळलेल्या स्थितीत गेलो. मला माझ्या आवाहनात्मक विश्वासाला साथ देवून, मजबरोबर उभे रहाणारी एक देखील व्यक्ति सापडू शकली नाही. शेवटी सामान्य प्रजा अशा निष्कर्षाप्रत येते की या ख्रिस्ती उपदेशकांना अशा प्रकारच्या अस्विकाराहार्य आणि अव्यवहार्य गोष्टी बोलण्या व्यतिरिक्त दुसरे काम नाही आणि त्यांनी माझ्या बोलण्यास मान्यता दिली नाही.

परंतु मी निराश झालो नाही. उलट प्रभुने माझे सांत्वन केले आणि **जो आपल्या विश्वासाचा उत्पादक व पूर्ण करणारा** (इब्री १२:२). त्याजवर भक्तकमपणे विसंबून राहण्याकरीता त्याची कृपा पुरवीली. प्रभु त्याच्या या वचनाद्वारे **माझ्या अंत:करणात प्रवेश केला, ''हे कीटका, याकोबा इस्राएलाचे लोकहो, भिऊ नका, असे परमेश्वर म्हणतो; मी तुझें साहाय्य करितो; इस्राएलाचा पवित्र प्रभु तुझा उद्धारकर्ता आहे. पाहा, मी तुझे तीक्ष्ण, नवीन व दुधारी असे मळणीचे आऊत बनवीत आहे; तू डोंगर मळून त्यांचा चुराडा करिशील व टेकड्यांचा भुसा करिशील** (यशया ४:१:१४-१५).

दिवस सरत गेले. देवाने मला माझा सभोवताली असलेल्या लोकांसमोर आशीर्वादीत केले आणि मोठ्या कृपेने त्याच्या सेवेकरिता, ज्या ठिकाणी त्याने मला विश्वास ठेवण्यास शक्य केले त्याच ठिकाणी अद्भूत अशी जागा दिली.

जागा मिळाल्यानंतर, ती खरेदी करण्याकरिता, विभागातील लोकांची अपेक्षा होती तेवढी रक्कम मजकडे नव्हती. मी माझ्या माहितीच्या लोकांकडून मदत मिळविण्याचे प्रयत्न केल, परंतु मी गरीब असल्यामुळे मला मदत करण्यास कोणीहि पुढे आला नाही. अशा स्थितीत सरकार मला मी त्यावेळी शासकीय नोकरीत असल्यामुळे इमारत खरेदी करण्यासाठी देवाने एक विधर्मी मित्र कन्नन आणि ख्रिस्ती मित्र एम. पी. जयाकुमार या दोघांचा उपयोग करुन घेतला. येशू ख्रिस्त विश्वसनिय आहे. तो सर्व समयी चांगला आहे. सर्व समयी येशू ख्रिस्त चांगला आहे. आपल्याला किती अद्भूत असा देव लाभला आहे! **अहो, परमेश्वर किती चांगला आहे याचा अनुभव घेऊन पाहा...** स्तोत्र ३४:८

आज हा संदेश लिहीत असताना देखील, मी तुम्हाला सांगू शकतो, की माझे जीवन खडबडीत आणि आवाहनांनी भरलेले असे आहे. मी अनेक अडचणी आणि अगणित अरिष्ट यांनी देवाने दिलेल्या सेवा १६ भाषेत प्रसिद्ध होत असलेले मासिक, **बायबलकोर**-पत्रव्यवहारा द्वारे करण्यात येत असलेल्या अभ्यासक्रम ३ भाषांमधील प्रशिक्षण अभ्यासक्रम, **नहेम्या बायबल कॉलेज**, मुख्य मंडळीतील प्रत्येक रविवारच्या ७ उपासना, **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय** आणि

त्यात भर कार्यालयीन व्यवस्थापन इत्याद सर्वांमध्ये भरडला गेलो आहे. माझ्या सेवाकार्यातील आणि व्यवस्थापकीय कामातील सांगू न शकणाऱ्या आणि प्रकट देखील करु न शकणाऱ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

मी निद्राहीन रात्री आणि झोपण्याची इच्छा नाही. अशा रात्री अनुभवल्या आहेत. मी एक धडा शिकलो आहे, की या जगात, जे अंधकाराने आच्छादीत आहे, दुष्ट शक्तिंचा दबाव आणि नैराश्य, यांनी भरलेले आहे, त्यांत केवळ प्रभु येशू ख्रिस्तच विश्वसनिय आणि ज्यावर अवलंबून राहाता येईल असा मित्र आहे. माझ्या जीवनात मी त्याचे मार्गदर्शन आणि त्याच्या दुरदर्शीपणाचा अनुभव घेत असल्यामुळे पुढील प्रसिद्ध गीत माझा अनुभव आहे -

**पुढे ने, दयाळूपणे प्रकाश,**
**पुढे ने, घेरलेल्या दाट अंधारात दयाळूपणे प्रकाश,**
**तू मला पुढे ने!**
**रात्र गडद आहे, आणि आहे मी घरापासून दूर,**
**तू मला पुढे ने!**
**माझे पाय सांभाळ; मी मागत नाही दूरचे दृष्य पहावयास;**
**एकच पाऊल पुरे मजकरिता.**

मला ठाऊक आहे, माझे दैनंदिन जीवन हे परीक्षा आणि अडचणींनी भरलेले असे आहे. परंतु मला खात्री आहे की मी या जगातले कार्य संपविल्यावर, मी माझ्या स्वर्गीय गृहात प्रवेश करून माझ्या स्वामी-येशू ख्रिस्ताला सामोरा समोर भेटणार आणि त्याच्या सुवर्ण चेहऱ्याला मिठी मारणार आणि या जगातील माझे अनुभव त्याला सांगणार. त्या दिवसाची मी आतुरतेने वाट पाहात आहे. तो एक महान दिवस असणार! तो दिवस एक अतिशय अशीर्वादीत दिवस असणार!!

प्रिय मित्रा, तुला अशी आशा आहे कां, आणि तुझी तशी तीव्र इच्छा आहे कां?

************

(पान ६ वरुन...)

कदाचित वाटत असेल, "मी देवाच्या जवळ जेव्हा चालतो, त्याच्या अपेक्षा फारच मोठ्या आहेत, त्यामुळे मी मागे राहिलेलाच बरा." आपल्यापैकी काहीजण मंडळीत उपासनेला जातात, परंतु मंडळीच्या कार्यात सहभागी होत नाहीत, काही जणांना तर मंडळीत उपासनेत जाऊ इच्छित नाहीत आणि काहीजण घरात राहुनच प्रार्थना करीतात. आपल्यापैकी काही जण गरज असते त्याचवेळी येशू ख्रिस्ताशी बोलता, नाहीतर इतर वेळेला त्याच्यासाठी त्यांना वेळच नसतो.

आज मी तुम्हाला येशू ख्रिस्ताच्या मागे दुरुन न चालता त्याच्या जवळून चालण्यास उत्तेजन देत आहे. तो या जगात मनुष्यांचा देवाशी समेट घडवून देण्यासाठी आला. त्या एकाच कारणासाठी, त्याने क्रुसावर त्याचा प्राण दिला आणि तिसऱ्या दिवशी पुन: जीवीत झाला. आपल्या आशारहित स्थितीत आशा देण्या करिता. वादळात शांती देण्याकरिता आपण प्रेमास पात्र नसताना देखील आपल्यावर प्रेम करण्यासाठी. रोम ८:३२ या वचनात म्हटले आहे. "**ज्यानें आपल्या पुत्रास राखून न ठेविता आपणा सर्वांकरिता त्याला दिले, तो त्याजसहित आपल्याला सर्व काही कसे देणार नाही?**" त्याला मागा, तो तुम्हांला सर्व जे उत्तम ते देण्यास तयार आहे.

दररोज त्याजशी बोला, त्याचे वचन वाचा. त्याचा आवाज ऐकण्याचा अद्याप अनुभव आला नसेल तर आपणच त्याला तशी विनंती करा. अशी प्रार्थना करा. "प्रभु तुला जवळून अनुसरण्याची माझी इच्छा आहे, दुरुन नाही. तुझा आवाज मला ऐकू येऊ दे. मला मदत कर, प्रभु केवळ आवाज ऐकण्यासच नाही, तर तूं सांगशील त्यानुसार करणयस देखील."

प्रभु करो आणि तुम्हां सर्वांना दुरुन नाही, तर जवळून चालण्यास मदत करो!

✤✤✤✤✤✤✤


# नहेम्या बायबल सायं कॉलेज
## चेपोक आणि संतोषपूरम, चेन्नई

माध्यम : तमिळ

विद्यार्थी ATA सभासद नोंदणीस पात्र

**आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५३ वर्षांपासून मान्यता प्राप्त**

Diploma in Ministry : One year
Diploma in Theology : Two years
Bachelor of Theology : Three years

**शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक**

**प्रवेशा करिता त्वरा करा !**

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, BELLS ROAD, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/21-23 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/21-23

## एको ऑफ हिज कोल

**यु ट्युब सबस्क्राईब करा**

जेव्हा तुम्हाला वेळ मिळेल तेव्हा कृपा करुन आमच्या **एको ऑफ हिज कॉल यु ट्युब चॅनल** बघा व सबस्क्राईब करा. धन्यवाद

**- संपादक**

## OUR BANK DETAILS:

### *1. Bank : State Bank of India*

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

### *2. Bank : ICICI Bank*

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

### *3. Bank : State Bank of India*

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**
*****
**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-** **आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/21-23**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/21-23**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel" on 12th JULY 2023**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**